# रसिका, तुझ्याचसाठी ! : ३

## "कोई सुनता है - A Journey with Kumar and Kabir"

रविवार दुपार. महाराष्ट्र मंडळाचा "रसिका तुझ्याचसाठी" सिरीज मधला कार्यक्रम होता. -- "कोई सुनता है - A Journey with Kumar and Kabir" असा आगळा वेगळा विषय होता. ह्या नावातच काहीतरी mystic होतं. कबीरांच्या नंतर जवळ जवळ ५०० वर्षांनी कुमार गंधर्व यांचा जन्म झाला.

मग ह्यांचा हा एकत्र प्रवास म्हणजे काय? प्रवास नक्की कुणाचा? त्यातून फोर्ड फाउंडेशन च्या मदतीने शबनम वीरमणी ह्यांनी तयार केलेली ही documentary. हे सगळंच मिश्रण जरा अद्भुत होतं. अशा ह्या कार्यक्रमाबद्दल बरेच औत्सुक्य घेऊन मी गेले. Documentary सुरु होऊन दहा मिनिटे सुद्धा झाली नसतील, मी hypnotize झाल्यासारखी जी खुर्चीला जी चिकटून बसले ते ९६ मिनिटे कशी गेली ते कळलं सुद्धा नाही. ही documentary बघताना मला जे वाटलं त्याविषयी चार ओळी लिहिण्याचा हा प्रयत्न. मी लेखक किंवा शास्त्रीय संगीतातली जाणकार नाही. त्यामुळे अनावधानाने काही चुका झाल्या असतील तर क्षमस्व.

Documentary ची सुरुवात "सुनता है गुरु ग्यानी" ह्या अतिशय सुंदर अशा भजनाने झाली. मन एकदम अंतर्मुख झाले. "ब्रह्मानंदी टाळी लागली" असे जेंव्हा लोक म्हणतात, तो हाच अनुभव असावा. तेव्हढ्यात पडद्यावर इंग्रजीमध्ये अक्षर यायला लागली,

Someone Listens - A guru, A wise one
A Voice Vibrates in the Sky - Subtle very Subtle
Someone Listens - A guru, A wise one

Riding the voice of Kumar Gandharva, these words drifted in, almost insidiously, into my drawing room.... and later, in my life. I knew Kabir as a "nirgun" poet - one who believes in a divinity, a truth beyond form. His words drew me towards them, and yet, mystified me.

What Sound?
Which Sky?
Who is listening?

अगदी कबीरांच्या थोडक्याच शब्दात शबनमजींनी ह्या documentary चं सार सांगून टाकलं आहे. २०व्या शतकातील कुमारजी, १५व्या शतकातील कबीरांच्या रचनांतून सांगत होते, "कोई सुनता है " - search for the voice inside you. तो आवाज, जो आपण ह्या जगाच्या कोलाहलात हरवून बसलेलो आहोत. त्याची ही documentary!

अगदी बालवयापासून कुमार गंधर्व हे शास्त्रीय संगीतातले उत्तम गायक-जाणकार म्हणून रंगमंच गाजवत होते. श्री देवधर यांना गुरु म्हणून स्वीकारून त्यांनी संगीतातले उर्वरित शिक्षण घेतले. त्यांना स्वतःच्या आणि स्वतःच्या गुरुंच्या संगीताबद्दल अतिशय

अभिमान होता. थोडं गर्वच होता म्हणा ना! नियतीचा खेळ बघा. यशाच्या अशा उत्तुंग क्षणी अमाप यश मिळत असताना, १९४७ मध्ये वयाच्या अवघ्या २३व्या वर्षी कुमारजींना क्षय रोगाने ग्रासले. गाणे हेच ज्यांचे जीवन आहे त्यांना "सा" सुद्धा गायला डॉक्टरांनी बंदी केली. त्या काळात क्षयासाठी औषधे नव्हती. स्वच्छ मोकळया हवेसाठी ते मध्यप्रदेशात देवास येथे रहायला गेले.

त्या काळात जेंव्हा कुमारजींना पलंगावरून उठण्याची सुद्धा परवानगी नव्हती, गायची परवानगी नव्हती. तेंव्हा त्यांना मनातून जाणवायला लागलं, आपण संगीतातले इतके तज्ञ. कार्यक्रम गाजवत होतो. लोकांकडून वाहवा मिळवत होतो. आणि आता एक क्षणात अशी स्थिती आली आहे कि आपल्याला एक सूरही गाता येत नाही. कुमारजी त्यांच्या विद्येच्या - प्रसिद्धीच्या नशेत एव्हढे रममाण झाले होते कि त्याशिवाय दुसरे जग आहे हेच ते विसरून गेले होते. पण क्षयरोगाने त्यांना आयुष्याची नश्वरता लक्षात आली. त्यातून १९५२ मध्ये ते क्षयातून बरे झाले. आणि १९५७ मध्ये त्यांची सहचारिणी हे जग सोडून निघून गेली. Life and death situation मधून जात असताना हे जग एक माया आहे याची त्यांना जाणीव झाली आणि त्यांचा आयुष्याकडे बघायचा दृष्टीकोन बदलला. एके दिवशी एक भिकारी त्यांच्या दारात गात उभा राहिला,

ऊड जायेगा हंस अकेला, जग दर्शन का मेला
जैसे पात गिरे तरुवरसे, मिलना बहुत दुरेला
कोई क्या जाने कंहा गिरेगा, लगा पवन का मेला

आणि मग अंतर्मनातून - चिंतनातून त्यांना कबीरांच्या काव्यातले सत्य जाणवायला लागले.

कबीर हे भक्ती संप्रदायातून आलेले असले तरी त्यांच्यातला संतकवी अतिशय धाडसी आहे. आयुष्य किती एकटे, निराशावादी आहे हे त्यांनी त्यांच्या काव्यातून स्पष्टपणे मांडले आहे. आपल्या "निर्गुणी" रचनांतून आपल्या सगळयांना ते सांगत राहतात कि जोपर्यंत तुम्ही ह्या संसारिक गोष्टीतून, आसक्तीतून बाहेर पडत नाही तोपर्यंत तुम्हाला भक्ती आणि मुक्ती कशी कळणार? पण भक्तीसंप्रदायातील इतर संतांच्या मानाने कबीरजींची भक्ती जरा वेगळी आहे. This requires a higher level of surrender, the one that can only be achieved in your own company...alone with nobody to consult and nobody to assist you. जीवनातील पोकळी त्यांनी जंगलात राहून नाही तर भर बाजारात उभे राहून लोकांना दाखवून दिली. आपल्या कवितेतून तत्कालीन धार्मिक प्रस्थापनेला आव्हान उभे केले. तेव्हढ्याच प्रगल्भपणे कुमार गंधर्वांनी सुद्धा हिंदुस्थानी संगीतातील सगळी तत्कालीन प्रमाण धुडकावून लावली. ज्यात एव्हढी जीवनाबद्दल अनासक्ती आहे, शून्यता आहे, अशी भजन आत्तापर्यंत कोणीच गायली नव्हती. "Sheer hollowness and awesome futility of life in his songs was mesmerizing". पण त्याचमुळे कुमारजी संगीताच्या माध्यमातून ईश्वरातत्वाशी इतके एकरूप झाले कि त्यामुळे त्यांच्या संगीतात आपण जेंव्हा रममाण होतो तेंव्हा त्या ईश्वर तत्वाचा आपल्याला सुद्धा अनुभव येतो. कुमारजींच्या संगीतातली ताकद त्यांच्या समर्पणाच्या भावनेतून आलेली आहे, त्यांचा अहंकार लोप पावलेला आहे. हा कबीर आणि कुमार ह्यांच्या मधला दुवा आहे.

पण जर ही documentary इथेच थांबली असती तर फार फार तर त्याला आपण "कुमारजींचा चरित्र" असं म्हणू शकलो असतो. पण ह्या documentary ची खासियत काही वेगळीच आहे. शबनमजी म्हणतात, "Some sing Kabir to make him their own, and some create their own Kabir. I had set out in search of Kumarji's Kabir but found myself flowing in these limitless currents of everybody's Kabir. More peple I met, more Kabir I met." शोभा मुद्गल आणि अशा प्रथितयश गायकांकडून गाणी ऐकल्यानंतर हळूच तुम्ही पोहोचता मध्य भारतातल्या छोट्या छोट्या गावात. त्या गावातले लोक, फळं विकणारे फेरीवाले, सामाजिक

कार्यकर्ते, मुस्लीम कव्वाली गायक असे बरेच जण आपल्या शब्दात कबिरांचं सत्य कसं मांडत आहेत ते आपल्याला अनुभवायला मिळतं. ह्या सगळ्यांनी त्यांना समजलेला कबीर आपापल्या शब्दातून, आजच्या जीवनातल्या अनुभवातून व्यक्त केला आहे. प्रत्येकाचे शब्द वेगळे, पण प्रत्येकजण आपल्याला चिंतन करायला लावतो. आपला स्वाभिमान, अहंकार, देश, जात, धर्म ह्या सगळ्या चौकातीतून बाहेर पडून आपल्यातल्या "स्व" ला शोधायला उद्युक्त करतो.

आपल्या डोळ्यांसमोर मध्यभारताचा चालता बोलता सांस्कृतिक प्रवाह उभा करतो. आणि मग आपण घरी परतताना आपल्या समोर सवाल उभा करतो: न वाचता आणि लिहिता येणारी, पण जिने भारतीय संस्कृतीचा इतिहास कोळून प्यायला आहे, कबीराची कविता स्वतः अनुभवली आहे आणि जी त्या जिवंत परंपरेचा एक अविभाज्य हिस्सा आहे ती फळं विकणारी सजनबाई अज्ञानी, कि तुमच्या आमच्या सारखी उच्च विद्याविभूषित मंडळी ज्यांना आपल्या संस्कृतीचा गंध नाही, ती अज्ञानी?

अंजली वळे